जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 MAY 2018
पुढारी

# विद्यापीठात महाराष्ट्र दिन साजरा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सकाळी आठ वाजता ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 MAY 2018
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठात रोजगार मेळावा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व केंद्रीय रोजगार कक्ष यांच्यावतीने १९ मे रोजी कौशल्य व रोजगार महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे' अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'मेळाव्यात विद्यार्थ्यांना रोजगार व नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. विद्यापीठाच्या सर्व अधिविभागांसह लोककला केंद्रात मेळाव्याची प्रक्रिया होणार आहे. ५० हून अधिक कंपन्या सहभागी होणार आहेत. नऊ क्षेत्रांत दोन हजार नोकऱ्या उपलब्ध होतील अशी शक्यता आहे. ३० स्टॉल्सच्या माध्यमातून १०० हून अधिक कौशल्यांचे प्रशिक्षण ६० प्रशिक्षकांकडून देण्यात येणार आहे. मेळाव्याचा लाभ संलग्न २८३ महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना घेता येणार आहे. मेळाव्यात सहभागी होण्यासाठी ऑनलाइन व ऑफलाइन नावनोंदणी प्रक्रिया सुरू असून ४ मेपर्यंत मुदत आहे. नोंदणीसाठी प्रा. ए. एम. गुरव यांच्याशी ९८५००१२५४५ किंवा ०२३१६०९१७३ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 MAY 2018
तरुण भारत

# विद्यापीठात एम. एड. संदर्भात शनिवारी मोफत मार्गदर्शन

कोल्हापूर : महाराष्ट्र शासनातर्फे १५ जून २०१८ रोजी एम.एड अभ्यासक्रमासाठी सामाईक प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेच्या संदर्भात मार्गदर्शनासाठी शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागामध्ये ५ मे रोजी सकाळी ११ वाजता मोफत मार्गदर्शन वर्ग आयोजित केला आहे. तरी विद्यार्थांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधिविभागप्रमुख डॉ. पी. एस. पाटणकर यांनी केले आहे.

3 MAY 2018
लोकमत




## साहित्य भान

प्रा. रणधीर शिंदे

# कादंबरीकार बाबा कदम

लोकप्रिय वाङ्मयप्रवाहात वैविध्यपूर्ण निर्मिती करणाऱ्या लेखकात बाबा कदम यांचे नाव अग्रभागी घ्यावे लागते. त्यांच्या कादंबऱ्यांस वाचकांकडून अफाट लोकप्रियता लाभली. बाबा कदम (वीरसेन आनंदराव कदम १९२९-२००९) यांचा जन्म त्यांच्या आजोळी अक्कलकोटला झाला. त्यांचे वडील कोल्हापूर संस्थानात आक्कासाहेब महाराजांचे स्वीय सचिव होते. त्यांचे बालपण कोल्हापुरात संस्थांनी वातावरणात गेले. लहानपणीच वडिलांचे छत्र हरपले. या पडत्या वयात त्यांना मामांचा आधार लाभला. छत्रपती राजाराम महाराजांकडून त्यांना दरमहा १५ रुपये शिष्यवृत्ती मिळाली. तपोवन वसतिगृहात राहून विद्यापीठ हायस्कूलमध्ये त्यांचे दहावीपर्यंत शिक्षण झाले. त्या काळात इंग्रजी व गणित हे विषय त्यांच्या नावडीचे होते. पुढे राजाराम महाविद्यालयात पदवीपर्यंतचे शिक्षण झाले. ना. सी. फडके, द. सी. पंगू, बी. जी. गोकाक हे शिक्षक त्यांना लाभले. याच काळात रणजित देसाई, शंकर पाटील हे त्यांचे पुढील वर्गातील समवयस्क सहअध्यायी.



'राजाराम'मधील वाङ्मयीन वातावरणाचा त्यांच्यावर खोलवर परिणाम झाला. बी.ए.ला असताना 'अजिंक्यतारा' ही त्यांची कथा प्रसिद्ध झाली. र. वा. दिघे यांच्या कादंबऱ्यांचा प्रभाव त्यांच्यावर पडला व त्यांच्याप्रमाणे पोलिसी तपासाधारित कथा लिहाव्यात, असे त्यांना वाटले. १९५०च्या सुमारास चित्रकार बाळ गजबरांच्या परिचयामुळे त्यांना चित्रकलेचा छंद जडला. गजबर यांनी काढलेल्या 'नवरा बायको' चित्रपटात एक भूमिकाही बाबा कदम यांनी केली. आरंभी एस. टी. खात्यात काही काळ क्लार्कची नोकरी केली. साईक्स कॉलेजमधून (आत्ताचे शहाजी लॉ कॉलेज) एलएल. बी.ची पदवी मिळाल्यानंतर त्यांनी काही वर्षे वकिली व नंतर कोल्हापूर, इचलकरंजी, जयसिंगपूर, बार्शी, कुरुंदवाड येथे जवळपास २८ वर्षे सरकारी वकील म्हणून काम केले.

१९६५ साली त्यांची 'प्रलय' ही कादंबरी प्रकाशित झाली. आणि एका नव्या कादंबरीकाराची ओळख महाराष्ट्राला झाली. प्र. के. अत्रे यांनी या कादंबरीवर अग्रलेख लिहिला. पोलिसी तपासशोध कथा, संस्थांनी जीवनावरील कहाण्या, समकाळातील राजकीय घडामोडीवर व गाजलेल्या गुन्हेगार कथांची पार्श्वभूमी त्यांच्या लेखनास होती. वाचकमनावर संमोहित करणारे विषयसूत्रे त्यांनी दिली. आपल्या कादंबऱ्यातून सत्यघटनांचा आभास, कल्पनाविलास व गोष्टीवेल्हाळ कथनांचे बेमालूम मिसळण केली. मनुष्यस्वभावाचे अनेकविध नमुने पेश केले. सुबोध, गतिमान अशा घटना-प्रसंगांच्या साखळीतून कादंबरीपट रचला. घटनाप्रधान कादंबरीस प्रतिष्ठा मिळवून दिली. बारीक सारीक तपशील असणाऱ्या या कादंबऱ्या एकटाकी बैठकीत लिहिल्याचे ते नोंदवतात. खिसेकापू तरुणीवर तसेच रेसकोर्सवरील जगावर कादंबरी लिहिली. वेश्या, खुनी, दरोडेखोर, अभिनेत्री, सर्वसामान्यांच्या श्रद्धाविश्वावर तसेच राजकीय नेत्यांवर कादंबऱ्या लिहिल्या. अजिंक्य, राजधानी, निर्मला, सन्ना, दगा, शाळा सुटली पाटी फुटली, अभिनेत्री, भालू, पाच नाजूक बोटे या कादंबऱ्यांच्या शीर्षकातून त्यांच्या कादंबरीची दिशा कळू शकते. त्यांच्या अनेक कादंबऱ्यांवर चित्रपटनिर्मितीदेखील झाली. बाबा कदम यांनी काही वेधक अशी व्यक्तिचित्रे लिहिली. चित्रकार व शिकारीचा छंद जपला. त्यांची जवळपास तीन हजार जलरंग व तैलरंगातील निसर्गचित्रे आहेत.

वाचकांच्या उत्कंठतेचा परमउत्कर्ष देणाऱ्या या कादंबऱ्यांत बाबा कदम यांनी सतत नवे विषय आणले. मुख्यत्वे प्रेमकहाण्या, खून, गुन्हे, मारामारी, संस्थांनी जीवनातील रहस्ये, न्यायालयीन खटल्यांची चर्चा अशा अनेकविध अनुभवविश्वाची जगे रेखाटली. वाचकमनात वसत असलेल्या कुतूहल जगाबद्दलच्या कहाण्या रचल्या. त्याला जोड दिली ती न्यायालयीन खटल्याची व पोलिसी हेरकथांची. कदम यांच्या कादंबऱ्या लोकप्रिय होण्याची दोन कारणे संभवतात. एक म्हणजे या कादंबऱ्यातील विषयवैविध्य आणि वाचन आवाहनतेचे गारुड. दुसरे म्हणजे बाबूराव अर्नाळकर, भयकथा, गूढकथा यांच्या टप्प्यानंतर वेगळे स्थित्यंतर कदम यांच्या लोकप्रिय कादंबऱ्यांतून घडले. त्याची कारणे बदललेल्या सामाजिक स्थितीत पहायला मिळतात. नव्या शिक्षित वाचकांना त्यांची आकांक्षा स्वप्नभूमी या कादंबऱ्यांत पहायला मिळाली. शिक्षणाच्या बहुविस्तारातून ग्रामीण-शहरी भागातून जो वाचक घडत होता. त्या जगाने या कादंबऱ्यांना तत्काळ प्रतिसाद दिला. अफाट वाचक लोकप्रियता लाभलेल्या या कादंबरीकाराचा ४ मे हा जन्मदिवस.